# वाचकांच्या ज्ञानाची भूक ग्रंथ भागवतात : डॉ. खताळ

देगलूर, ता. १३ : (बातमीदार) : आजच्या युगात माहिती आणि तंत्रज्ञानाचा प्रसार वेगाने होत असला तरी माहितीच्या महासागरात खरी माहिती व ज्ञान शोधण्यासाठी आजही ग्रंथालयातील ग्रंथच योगदान देत असतात. म्हणूनच वाचकांच्या वाचनाची भूक भागवण्यासाठी व त्यांना ज्ञान पुरवण्यासाठी ग्रंथच यशस्वी ठरत आहेत. असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. मोहन खताळ यांनी केले.

ते येथील देगलूर महाविद्यालय ग्रंथालय विभाग व श्री समर्थ वाचनालय देगलूर यांच्या संयुक्त विद्यमाने एमओयूअंतर्गत राष्ट्रीय ग्रंथपाल दिनाच्यानिमित्त आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपप्रसंगी बोलत होते. यावेळी व्यासपीठावर समर्थ वाचनालय संस्थेचे अध्यक्ष सूर्यकांत नारलावार, कार्यवाह अविनाशराव देशपांडे उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार उपस्थित होते.

डॉ. खताळ पुढे म्हणाले, देगलूर शहरातील एक यशस्वी वैभवशाली वारसा असणारे तसेच या भागात साठ वर्षांपासून वाचकांच्या ज्ञानाची भूक भागवण्याचे कार्य सातत्याने देगलूर येथील श्री समर्थ वाचनालय करीत आहे.

प्रास्ताविक ग्रंथपाल पुंडलिक कदम यांनी केले. त्यानंतर वाचनालयात ग्रंथपाल दिनानिमित्ताने आयोजित ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. खताळ यांच्या हस्ते करण्यात आले. सूत्रसंचालन ग्रंथपाल डॉ. साईनाथ शिंदे यांनी केले. या कार्यक्रमास प्रा. महेश कुडलीकर, प्रा. डॉ. संतोष येरावार, शिवाजी पाटील, राम पाटील, नामदेव शिंदे, सुधाकर जबडे, मोहम्मद अबीद, गंगाधर घुळेकर, जयराम गुरुपवार, विठ्ठल पुठ्ठेवाड यांच्यासह वाचक, नागरिकांची उपस्थिती होती.



**देगलूर :** राष्ट्रीय ग्रंथपाल दिनानिमित्त डॉ. मोहन खताळ, उपस्थित मान्यवर.

Scanned with OKEN Scanner